डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ

वाघापूर रोड, यवतमाळ-४४५००१(महाराष्ट्र)

डॉ. के. डी. ठाकुर
पी. एच. डी.
सहयोगी अधिष्ठाता

दुरध्वनी : ०७२३२-२५१०८५
फॅक्स : ०७२३२-२५१०८५
ई-मेल : vncabt.ytl@gmail.com

---

जा.क्र/वनाकृजैतंम/1014 /२०२१
दिनांक : 17 /०२/२०२१

## निविदा सुचना

प्रति,
मे. ..........................................................
..........................................................

विषय: वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ या महाविद्यालयाकरिता सहकारी संस्थांमार्फत ठेकेपध्दतीने/ कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा दरपत्रक पाठविण्याबत ...

या सुचनेव्दारे खालील नमुद केल्यानुसार कामांकरिता **सहकारी संस्थांनी** ठेकेपध्दतीने/ कंत्राटी तत्वावर **मजुर** पुरविण्यासाठी आपले निविदा दरपत्रक या कार्यालयास दि. १५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यंत किंवा त्यापुर्वी सकाळी कार्यालयीन वेळेवर पाठवावे.

| अ. क्रं. | विवरण | मनुष्यबळाची संख्या | दर प्रती दिन (रु.) किमान वेतन कायदा अनुसार |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटी मजुर (पुरुष) मुलांचे वसतीगृह | ०४ | |
| २ | कंत्राटी मजुर (स्त्री) मुलींचे वसतीगृह | ०४ | |
| ३ | ग्रंथालय साफसफाई, पुस्तकांची मांडणी व देखभाल इ. दैनंदीन कामाकरीता | ०१ | |
| ४ | व.ना.कृ.जै.म., यवतमाळ प्रक्षेत्र (शेतीची कामे) | ०४ | |
| ५ | गेस्टहाउस साफसफाई, देखभाल व परीसर स्वच्छता इ. | ०१ | |
| ६ | कार्यालयातील स्वच्छता गृह व मुलांचे वसतीगृह येथील स्वच्छतागृहाची स्वच्छता करणे | ०१ | |
| ७ | प्रयोगशाळा स्वच्छ करणे, प्रयोगशाळेतील उपकरणे स्वच्छ करणे इ. | ०२ | |
| ८ | कार्यालय स्वच्छता मिटींग हॉल,आस्थापना विभाग,शिक्षण विभाग,प्लेसमेंट सेल, क्लासरुम,कार्यालयातील पूर्ण पॅसेज इ. | ०१ | |
| ९ | चौकीदार/पहारेकरी (मेन गेट ०३, गेस्ट हाउस ०३,मुलीचे वसतीगृह ०३) | ०९ | |

PTO.....

Scanned by TapScanner

कृपया दर नमुद करतांना खालील दिलेल्या सुचना तसेच मागील पानावरील शर्ती व अटी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.

१. निविदा दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. मुदतीनंतर येणारी निविदा दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
२. डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कंत्राटी मजुरांकरीता असलेल्या दराचे अवलोकन करावे.
३. दरपत्रके सिलबंद पाकीटात पाठवावीत.
४. दरपत्रके या निविदा सुचनेचा संदर्भ क्रं. नमुद करावा. निविदा दरपत्रकातील दर सर्व करांसहीत **(GST)** असावेत. ज्या सेवांना **(GST)** लागू आहे त्या बाबतचा **(GST)** नमुद करावे.
५. **दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी., भविष्य निर्वाह नोंदणी, पॅन कार्ड, आधार कार्ड इ. प्रमाणपत्र जोडण्यात यावे.**
६. निविदा दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता, वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ** यांचे नावाने द्यावे तसेच पाकीटावर **"कंत्राटी मजुर पुरविण्याकरिता दरपत्रक "** असे नमुद करावे. तसेच दरपत्रकावर मोबाईल नं. टाकण्यात यावा.
७. निविदा दरपत्रक हे आर्थीक वर्ष एप्रील २०२१ ते ३१ मार्च २०२२ पर्यंत वैध राहिल.
८. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा अस्विकारण्याचे तसेच निविदा प्रकीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामे ही दैनंदीन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.
२. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावावी.
३. सदर कामे ही पुर्णतः ठेकेपध्दती / कंत्राटी असल्याकारणाने मजुरांच्या वरिष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
४. कोणत्याही कंत्राटी मजुराला कामावर ठेवणे वा मधुन काढुन टाकणे हे संपूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, व.ना.कृ.जै.तं.म., यवतमाळ यांचे कडे आहेत.
५. कामावरील कंत्राटी मजुराला किमान वेतन कायदा अंतर्गत वेतन देण्यात यावे.
६. कामावरील रोजंदार मजुराचे अपघात वीमा, भ.नि.नि. खाते वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार / ठेकेदार यांची राहील.
७. सदर रोजंदार मजुर पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे तसेच GST नोंदणी संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावेत सदर दरपत्रक दि. १५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सहयोगी अधिष्ठाता यांचे कक्षात उघडण्यात येईल.

सहयोगी अधिष्ठाता
वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान
महाविद्यालय (डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला)

प्रतिलिपी:-

१ प्रभारी अधिकारी, (ARIS Cell) प्रभारी डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना सदर निविदा विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या विनंतीसह अग्रेषीत.

Scanned by TapScanner